जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUL 2025
पुण्यनगरी

# दूरशिक्षण, ऑनलाईन केंद्र सुटीदिवशी सुरू

## प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांची माहिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची विविध अभ्यासक्रमांची प्रथम व द्वितीय वर्षांची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे शनिवार, दि. १२ आणि रविवार, दि. १३ जुलै या सुटीच्या दिवशी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे मुख्य कार्यालय सुरू राहणार असल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम., एम. एस्सी. (गणित), एम. बी. ए. (डिस्टन्स आणि ऑनलाईन मोड) या अभ्यासक्रमांचे प्रथम व द्वितीय वर्षाचे प्रवेश फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या केंद्रामध्ये प्रवेश घेणारे बहुतांश विद्यार्थी नोकरी करून शिक्षण घेणारे असल्याने सुटीदिवशी प्रवेश घेणे, अभ्यासक्रमांची माहिती घेण्यासाठी येत असतात. या कारणास्तव सुटीदिवशी मुख्य कार्यालय सुरू राहणार आहे. ही कार्यवाही दि. १५ सप्टेंबरपर्यंत राबवण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUL 2025
पुण्यनगरी



# 'संत गजानन अभियांत्रिकी 'चा गौरव

**महागाव :** येथील संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठातर्फे २०२४-२५ चा विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेतून ग्रामीण गटात गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये सलग चौथ्यांदा प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत यांचा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावर्षी संत गजानन महाविद्यालयाने ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची प्रभावी अंमलबजावणी केली. याच कार्याची नोंद घेऊन विद्यापीठात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविले. याकामी प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत यांच्यासह विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळाले. संस्थाध्यक्ष ॲड. अण्णासाहेब चव्हाण, डॉ. यशवंत चव्हाण, डॉ. संजय चव्हाण, ॲड. बाळासाहेब चव्हाण यांनी शिक्षकांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUL 2025
सकाळ

# रोजगार संधींच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना 'एईडीपी' उपयुक्त

## डॉ. एन. एन. वडोदे : विद्यापीठात विशेष कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ११ : 'देशात रोजगारवृद्धी होण्याच्या अनुषंगाने 'अप्रेंटिसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' (एईडीपी) अमलात आणण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना विद्यार्थीदशेमध्येच नोकरीची हमी मिळण्याच्या दृष्टीने हा उपक्रम लाभदायक ठरेल. कोल्हापुरातील व्यावसायिक, उद्योजकही विद्यार्थ्यांना अप्रेंटिसशीप देण्याबाबत सकारात्मक आहेत. अनेक ठिकाणी विद्यार्थी काम करतही आहेत. अन्य विद्यार्थ्यांनाही अशी प्रशिक्षण संधी मिळावी', अशी अपेक्षा केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या बोर्ड ऑफ अप्रेंटिसशीप ट्रेनिंगचे (बीओएटी) पश्चिम विभागीय उपसंचालक डॉ. एन. एन. वडोदे यांनी केले.

एईडीपीच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठातील शिक्षकांसह संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांसाठी आयोजित विशेष कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'अनेक अभ्यासक्रमांना वरिष्ठ नियामक प्राधिकरणांचे नियम लागू असतात. त्यांच्या मान्यतेखेरीज एईडीपीसंदर्भात पुढे जाणे अशक्य असले तरी बीए, बीकॉम, बीएस्सी अशा पारंपरिक अभ्यासक्रमांच्या विनाअनुदानित तुकड्यांपासून अंमलबजावणीला सुरुवात करता येणे शक्य आहे. त्या अनुषंगाने ३१ जुलैपर्यंत अभ्यासक्रमांची संरचना करावी लागेल.'

यावेळी नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी एईडीपी अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने सादरीकरण केले. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत केले. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. ज्योती जाधव यांच्यासह अधिविभागप्रमुख, शिक्षक, प्राचार्य उपस्थित होते. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी आभार मानले.

**सामंजस्य करार करणारे राज्यातील पहिले विद्यापीठ**

'विद्यार्थ्यांना द्यावयाची संधी आणि भत्ता या अनुषंगाने बीओएटी प्रभावी मध्यस्थाची भूमिका बजावेल. बीओएटीसमवेत आजवर अनेक डिम्ड आणि स्वायत्त विद्यापीठांनी सामंजस्य करार केले आहेत. तथापि, शिवाजी विद्यापीठ हे अशा प्रकारचा सामंजस्य करार करणारे पहिले राज्य अकृषी विद्यापीठ ठरले आहे', असे डॉ. वडोदे यांनी सांगितले.

12 JUL 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशाचे रंग उधळा, देशाचे नाव उज्ज्वल करा

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे क्रीडापटूंना आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर यशाचे रंग उधळत चला, स्वत:बरोबरच विद्यापीठाचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करा, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कलर पुरस्कार वितरण समारंभात पुरस्कारप्राप्त क्रीडापटूंसोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. शरद बनसोडे आदी.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण अधिविभागातर्फे आयोजित 'कलर पुरस्कार प्रदान समारंभ २०२३-२४' कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाचे क्रीडापटू दरवर्षी विविध राष्ट्रीय स्पर्धांमध्ये विविध पदके जिंकून चमकदार कामगिरी बजावतात. अखिल भारतीय स्तरावरील स्पर्धांत विविध पदके प्राप्त करणारे ८३ क्रीडापटू, खेलो इंडिया स्पर्धेत पदक मिळविणारे २९ क्रीडापटू आणि त्यांचे प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक यांचा विद्यापीठाचे स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या ११ क्रीडापटूंनी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त केले. परीक्षांच्या काळात स्पर्धा असल्या तर कारकीर्दीवर परिणाम होऊ नये म्हणून स्वतंत्र परीक्षा घेण्याचे धोरण विद्यापीठाने अवलंबले. आता तर बी.ए. स्पोर्टस् हा स्वतंत्र पदवीस्तरीय अभ्यासक्रम सुरू करून क्रीडा हाच अभ्यास ठेवून या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संधीची कवाडे खुली केली आहेत. भव्य कुस्ती संकुल उभारले असून क्रीडा वसतिगृह उभारणीचे काम गतीने सुरू आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने नेहमीच आपल्या परिक्षेत्रात क्रीडाविषयक परिसंस्था विकसित व्हावी, यासाठी प्रयत्न केले आहेत. खेळाडूंतील क्रीडा नैपुण्यासाठी शिवाजी विद्यापीठ सर्वदूर ओळखले जावे. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी केवळ राष्ट्रीय स्पर्धांतील यशावर समाधानी न राहता पुढे जागतिक स्तरावर जाण्यासाठी कसोशीने प्रयत्न करावा. प्रखर जिद्द आणि लढाऊ वृत्तीने आपले संपूर्ण क्रीडाकौशल्य पणाला लावून जागतिक दर्जाचे यश मिळविण्यासाठी स्पर्धेत उतरा.

क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. एन.डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर किरण पाटील यांनी आभार मानले. यावेळी शिवछत्रपती पुरस्कार विजेते क्रीडापटू कल्याणी पाटील, श्रुती भोसले, पृथ्वीराज पाटील, साक्षी बनसोडे, दीपाली गुरसाळे, धनंजय जाधव, श्रीधर निगडे, गिराश जकाते यांच्या उपस्थितीत तर आदिती स्वामी, ऐश्वर्या पुरी यांचा त्यांच्या अनुपस्थितीत गौरव करण्यात आला. आंतरराष्ट्रीय खेळाडू रोहन कांबळे यांचाही यावेळी गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUL 2025
सकाळ

# विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्र सुटीदिवशी सुरू राहणार

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची विविध अभ्यासक्रमाची प्रथम व द्वितीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे शनिवारी (ता. १२) आणि रविवारी (ता. १३) सुटीच्या दिवशी दूरशिक्षण केंद्राचे मुख्य कार्यालय सुरू राहणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील बी. ए., बी. कॉम., एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम., एम. एस्सी. (गणित), एमबीए (डिस्टन्स मोड) व एम. कॉम., एम. एस्सी. (गणित), एमबीए (ऑनलाईन मोड) या अभ्यासक्रमांचे प्रथम व द्वितीय वर्षाचे प्रवेश फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. या केंद्रामध्ये प्रवेश घेणारे बहुतांश विद्यार्थी नोकरी करून शिक्षण घेणारे असल्याने सुटीदिवशी प्रवेश घेणे, अभ्यासक्रमांची माहिती घेणे करिता या केंद्रामध्ये येत असतात.

या कारणास्तव दूरशिक्षण ऑनलाईन शिक्षण केंद्राचे कार्यालय शनिवारी आणि रविवारी मुख्य कार्यालय सुरू राहणार आहे. ही कार्यवाही १५ सप्टेंबरपर्यंत राबविण्यात येणार असल्याची माहिती या केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUL 2025
पुण्यनगरी

# दूरशिक्षण, ऑनलाईन केंद्र सुटीदिवशी सुरू

## प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांची माहिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची विविध अभ्यासक्रमांची प्रथम व द्वितीय वर्षांची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे शनिवार, दि. १२ आणि रविवार, दि. १३ जुलै या सुटीच्या दिवशी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे मुख्य कार्यालय सुरू राहणार असल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम., एम. एस्सी. (गणित), एम. बी. ए. (डिस्टन्स आणि ऑनलाईन मोड) या अभ्यासक्रमांचे प्रथम व द्वितीय वर्षाचे प्रवेश फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या केंद्रामध्ये प्रवेश घेणारे बहुतांश विद्यार्थी नोकरी करून शिक्षण घेणारे असल्याने सुटीदिवशी प्रवेश घेणे, अभ्यासक्रमांची माहिती घेण्यासाठी येत असतात. या कारणास्तव सुटीदिवशी मुख्य कार्यालय सुरू राहणार आहे. ही कार्यवाही दि. १५ सप्टेंबरपर्यंत राबवण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.